# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

## (दुपार)

जा.क्र. ३०५ /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १५/०६/२०१८

**१) धान खरेदी करुन व मिलींग करुन तांदुळ जमा न करता शासनाचा विश्वासघात करुन शासनाची फसवणुक केल्याने गुन्हा नोंद :–**

सन २०११ ते २०१२ चे खरीप हंगामते १४/०६/२०१८ पर्यन्त यातील नमुद आरोपी यांना शासनाने आधारभुत किंमत खरेदी योजना अंतर्गत हंगाम सन २०११ ते २०१२ मध्ये दिगर आदीवासी क्षेत्रात धान भरड धान्य खरेदी करण्याकरीता दि. महा स्टेट को. आपरेटीव्ह मार्केटींग युनायटेड मुंबई ०९ जि. पनन अधि. कार्या. भंडारा यांनी समंती व्द्रारे अटी व शर्ती नुसार नियुक्त केले होते यातील आरोपीला शासनाने धान खरेदी करुन दिले व त्याचे मिलींग करुन ६७ टक्के प्रमाणे तांदुळ शासनास जमा करणे अपेक्षित होते परंतु यातील आरोपीने अटी व शर्तीचा भंग करुन ६७ टक्के प्रमाणे तांदुळ जमा न करता शासनाचा विश्वासघात करुन तांदळाचा परस्पर विल्हेवाट लावुन एकुण ६ लाख ६८ हजार १४/–रु. चा अपहार करुन शासनाची फसवणुक केल्याने फिर्यादी गणेश तुकाराम खर्चे वय ३८ वर्ष, जिल्हा पनन अधिकारी भंडारा यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ४०५,४०६,४०९,४६५,४६७,४६८,४७०,४२०,४३४,१२०(ब). भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनि. बन्सोडे पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत

**२) संगनमत करुन क्षुल्लक कारणावरुन भांडण करुन कुऱ्हाडीने मारुन जखम केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १४/०६/२०१८ चे १७.१५ वाजता दरम्यान यातील आरोपी क्र. १ याला फिर्यादीने तु आमच्या बांध्यात दारुचे खाली बाटला फेकता असे हटकल्यावरुन भांडण झालेवर यातील फिर्यादी हा आपले शेतात काम करीत असतांना आरोपी क्र. २ हा फिर्यादीस तु मघाशी माझ्या भावाला मारलास मी तुला पाहुण टाकीन तु का समझतोस असे बोलत शिवीगाळ करित असतांना फिर्यादीने मगासीचा झगडा मिटला मी तुझ्या भावाला मारले नाही असे बोलताच आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीस थापडबुक्यांनी मारपीट केले व आरोपी क्र. १ च्या हातातील कुऱ्हाड फिर्यादीच्या हाताचे पंज्याला लागुन जखम झाली तसेच फिर्यादीचे ओटाला मार लागुन जखम होवुन त्यानी मारपीट केल्याने हात, पाय, डोका व पाठ दुखत असल्याचे फिर्यादी भुमेश्वर उर्फ दिपक काशिराम चामलाटे वय ३५ वर्ष, रा. पलाडी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३२४,५०४,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नवखरे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत

**३) क्षुल्लक कारणावरुन भांडण करुन डोक्यावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १४/०६/२०१८ चे १८.३० ते १९.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीचा पती जखमी अनंता भुसारी याने आरोपीस तु आमच्या जागेत काळया फाटे का ठेवलास म्हणुन हटकले असता आरोपीने फिर्यादीचे डोक्यावर मारुन दुखापत केल्याने फिर्यादी सौ. अनिता अनंता भुसारी वय २६ वर्ष, रा. पालांदुर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३२४,५०४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. रामटेके पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

**४) गळफास घेवुन इसमाचा मृत्यु :–**

दिनांक १४ /०६/२०१८ चे ०३.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी अनिल श्रीराम गायधने वय ४५ वर्ष, रा. विद्यानगर नागपुर रोड भंडारा यांचे मित्र मृतक नागवेंद्र सुर्यनारायण राव वय ४५ वर्ष, रा. हट्‌टेवार यांचे घरी विद्यानगर नागपुर रोड भंडारा याने मागील २ वर्षा पासुन त्याला स्वत:ला असलेलया गळयाचा कॅंसरचा त्रास व त्याची हालावलेल्या प्रकृतीचे चिंतेपाई गळफास घेवुन मरण पावला असावा असे फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अवये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गायधने पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**५) ईलेक्ट्रीक करंट लागुन इसमाचा मृत्यु :–**

दिनांक १४ /०६/२०१८ चे ०८.३० ते ११.३० वाजता दरम्यान यातील मृतक भाऊराव राजेराम सार्वे वय ५५ वर्ष, रा. घोडेझरी ह.मु. पहेला हा नेहमी प्रमाणे शेतात शेळया करिता झाडाचे डारा (फांदया) आणायला गेला असता आंजनाचे झाडावर चढुन डारा तोडत असतांना झाडवरुन ईलेक्ट्रीकची मोठी लाईन गेली असुन त्या ईलेक्ट्रीक ताराचा करंट झाडाचे फांदीला लागुन मृतकाला करंट लागुन खाली जमीनीवर पडुन मृत्यु पावल्याने फिर्यादी अरुण केवळराम राऊत वय ३९ वर्ष, रा. पहेला यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम १७४ जाफौ. अवये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सतदेवे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

६) उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु :–

दिनांक १२ /०६/२०१८ चे १२.३० वाजता दरम्यान यातील मृतक गौरीशंकर झिबल संतापे वय ३० वर्ष, रा. नवरंगाव पोस्टे अरोली जि. नागपुर हा अति मद्यप्राशन करुन त्याची प्रकृती बिघडल्याने त्यास औषधोपचाराकरीता समान्य रुग्नालय भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पोस्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ. शेंडे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम १७४ जाफौ. अवये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

७) गळफास लावुन युवकाचा मृत्यु :–

दिनांक १३+१४ /०६/२०१८ चे रात्र दर ते सकाळी ०७.०० वाजता पुर्वी यातील फिर्यादीचा पुतण्या मृतक मनोज अशोक जगनाडे वय २० वर्ष, रा. मानेगाव हा नेहमी प्रमाणे आपले बैल बांधण्याचे गोठयात मानेगाव वरुन मकरधोकळा येथे झोपण्यास गेला असता गोटयाचे लाकडी मयालीला दोर बांधुन गळफास लावुन मरण पावलेल्या स्थितीत मिळुन आल्याने फिर्यादी विलास शामराव जगनाडे वय ४४ वर्ष, रा. मकरधोकळा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १७४ जाफौ. अवये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. मुटकुरे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

८) रॉकेल घेवुन उपचारा दरम्यान महिलेचा मृत्यु :–

दिनांक ०३ /०६/२०१८ चे ०८.३० वाजता दरम्यान यातील मृतक सौ. वंदना संजय भोंडे वय ४५ वर्ष, रा. आमगांव/दिघोरी हिला मागील ४ वर्षा पासुन हदयाची बिमारी झाली होती यातील मृतकने हद्याचे आजारचे त्रासाने रॉकेल घेवुन जास्त प्रकृती खराब झाल्याने तिला प्रथम सामान्य रुग्नालय भंडारा येथे उपचार होवुन रेफर झालेवर अपघात विभाग मेडीकल कॉलेज नागपुर येथे नेले असता सिएमओ राठोड यांनी ब्राड डेथ घोषीत केल्याने पोस्टे अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र आज रोजी प्राप्त णल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. खैरे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १७४ जाफौ. अवये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. नवखरे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

९) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक १४/०६/२०१८ चे १२.१५ ते १२.४५ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील काळी पिवळी वाहन बस स्थानक समोर साकोली येथे सार्वजनिक रोडवर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. रामटेके यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रामटेके पोलीस स्टेशन साकोली करीत आहेत.

१०) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक १४/०६/२०१८ चे १८.०० ते १८.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मिनीडोअर वाहन पेट्रोलपंप ठाणा येथे सार्वजनिक रोडवर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. रामटेके यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. रामटेके पोलीस स्टेशन जवाहरनगर करीत आहेत.

११) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक १४/०६/२०१८ चे १८.०० ते १९.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन नगर पालीका समोर येथे सार्वजनिक रोडवर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना.वडीकर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना.वडीकर पोलीस स्टेशन तुमसर करीत आहेत.

१२ ) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक १४/०६/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ७७ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून तीन सिटर वाहनाकरीता– ०६ ईतर वाहनांवरती – ७१ केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनि.प्रणती लांजेवार)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.